ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-IV July - August 2021

# प्राथमिक स्तरावर सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पद्धती राबविताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास

**संशोधक विद्यार्थी**

**बाबासाहेब बलभीम पवार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**मार्गदर्शक**

**डॉ. एस. एस. देशपांडे**

सहयोगी प्राध्यापक

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद.

**प्रस्ताविक :**

शिक्षण हे मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. कारण मानवाच्या जीवनाला दिशा देण्याचे काम शिक्षण करते. व्यक्ती शिक्षण घेते कारण त्याला चांगले जीवन व्यतीत करण्यासाठी शिक्षणामूळे व्यक्तीची काम करण्याची कार्यक्षमता वाढते. पर्यायाने व्यक्तीचे कुटूंब व समाज सशक्त बनतो. शिक्षण हे मुलांमध्ये परिपक्वता व जबाबदारी वाढविते. म्हणजेच व्यक्तीला जीवन जगण्याची कला शिक्षणच बहाल करते.

Aarhat Publication & Aarhat Journalsis licensed Based on a work athttp://www.aarhat.com/eiirj/

शिक्षण हे व्यक्तीला जबाबदार, कर्तृत्ववान, चारित्र्यवान, विद्वान व मजबूत बनविते, थोडक्यात शिक्षण ही एक विकासाची प्रक्रिया आहे. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञानप्राप्ती नव्हे तर शिक्षण म्हणजे व्यक्तीमत्त्वाचा पूर्ण विकास त्यामूळेच शिक्षण हे व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत संस्कार करीत असते. शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगिण विकास होत असतो.

शिक्षण या संकल्पनेचा विस्तृत प्रमाणावर विचार केला असता असे दिसून येते की, शिक्षण प्रक्रियेत अनेक परिवर्तने होऊन सक्तीच्या शिक्षण हक्काचा कायदा सुध्दा अस्तित्त्वात आला आहे. प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण बदल घडत आहेत. शैक्षणिक संशोधनातून आणि प्रयोगातून साकारलेले नवे विचार, नव्या पध्दती, आधुनिक तंत्रे आणि तत्त्वे यांच्यामुळे शिक्षण प्रक्रियेतील प्रवेश सुकर झाला आहे. शिक्षणातील गेल्या चार-पाच वर्षातील ठळक परिवर्तन म्हणजे मूल्यमापन पध्दतीत आलेला बदल. आता माहितीवर

आधारित परीक्षा राहणार नसून शिकत असतांना घडामोडी मूल्यमापन होईल अशी सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दती अस्तित्त्वात आली आहे.

मूलांना वाचायला, लिहायला तर यावेच पण त्याचबरोबर त्याला उत्तम बोलायला यावे, त्यांनी सभोवतालच्या परिसरातील घटनांचे आणि वस्तुचे ही निरीक्षण करून ज्ञान मिळवावे, हाताने विविध कामे करावीत, कला कौशल्ये शिकवावीत, विविध कलांचा आस्वाद घेण्यास शिकावे, त्याचे व्यक्तीमत्त्व अनेकाविध अंगानी बहरावे अशी अपेक्षा आहे. मुलांच्या केवळ स्मरणाचा नव्हे तर आकलन, उपयोजन, विचारशीलता, सर्जनशीलता, कल्पकता अशा क्षमतांचा परिपूर्ण विकास व्हावा हे व्यापक उद्दिष्ट ठेवून सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीचा स्वीकार केला आहे.

सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनाची रचना करतांना आकारिक मूल्यमापन व संकलित मूल्यमापन असे दोन विभाग करण्यात आले आहेत. आकारित मूल्यमापन करण्यासाठी उपयुक्त अशी मूल्यमापन तंत्रे देण्यात आली आहेत व त्याचा वापर करण्याचे स्वातंत्र्य शिक्षकांना देण्यात आले आहे.

सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीबाबत निर्णय घेण्यापूर्वी शासनाने विविध पातळ्यावर दीर्घ विचार मंथन घडवून आणले. तज्ञाकडून विविध पैलू तपासून पाहिले आणि मग मुलांच्या शैक्षणिक विकासाची हमी देण्याची क्षमता असलेली सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दती लागु केली. मूल्यमापनाला शिक्षण प्रक्रियेत अनन्यसाधारण महत्त्व आहे. मूल्यमापन प्रक्रियेवरतीच शिक्षणाच्या उद्दिष्टांच्या यशापयशाची निश्चिती अवलंबून आहे.

प्राथमिक शिक्षण पायाभूत शिक्षण आहे. प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तीमत्त्वाचा म्हणजेच शारीरिक, बौध्दीक, भावनिक, अशा विविध स्तरावरील क्षमता आणि कौशल्य यांचा विकास अपेक्षित असतो. त्यानुसार उद्दिष्टे निश्चित केलेली असतात.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-IV July - August 2021

विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होत असतांना मूल्यमापनातून वेळोवेळी त्यांच्या अध्ययनातील त्रुटी अडचणी वेळेच्यावेळी दूर होऊन त्याची उत्तम प्रगती व्हावी अशी अपेक्षा असते.

शासनाने सुरू केलेल्या या मूल्यमापन पध्दतीबद्दल अहमदनगर जिल्ह्यातील कनिष्ठ प्राथमिक स्तरावर सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीबद्दल काय स्थिती आहे? सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीची अमलबजावणी या जिल्ह्यात कशी होत आहे? कशी केली गेली? सातत्यपुर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीची अमंलबजावणी करतांना कोणकोणत्या समस्या अडचणी आल्या तसेच ह्या समस्या अडचणी कमी करण्यासाठी काय करता येईल? याबाबत उहापोह करण्याचा अत्यंत प्रभाविकपणे प्रयत्न संशोधकाने केला आहे.

**संशोधनाची गरज व महत्त्व :**

प्राथमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे. प्राथमिक शिक्षणापासूनच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शारीरिक, बौध्दिक, भावनिक अशा स्तरावरील क्षमता आणि कौशल्ये यांचा विकास अपेक्षित असतो. त्यानुसार प्राथमिक शिक्षणाची सर्वसाधारण उद्दिष्टे निश्चित केली जातात. विषयनिहाय उद्दिष्टे निश्चीत केली जातात. विद्यार्थ्यामधील सुप्त शक्ती, क्षमता आणि विविध कौशल्येही अध्ययन अध्यापन विविध अनुभव यामधून विकसित होत असतात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होत असतांना मूल्यमापनामधून वेळोवेळी त्यांच्या अध्ययनातील त्रूटी अडचणी वेळच्यावेळी दूर होऊन त्यांची उत्तम शैक्षणिक प्रगती व्हावी अशी अपेक्षा असते.

शैक्षणिक मूल्यमापन प्रक्रिया ही अध्ययन अध्यापन शिक्षणप्रक्रियेच्या दर्जावर आणि परिणामी एकंदर शैक्षणिक व्यवस्थेत त्रुटी अथवा दोष राहिल्यास शैक्षणिक गुणवत्तेच्या विकासात अडथळे येतात.

त्यामुळेच प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून संशोधकाला असे प्रश्न पडले की, अहमदनगर जिल्ह्यातील सातत्यपुर्ण सर्वकष मूल्यमापण पध्दतीची स्थिती काय आहे? सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीची अमंलबजावणी करत असतांना शासकीय

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

Volume-X, Issues-IV July – August 2021

पातळीवर, प्राथमिक शाळेतील शिक्षकांना कोणकोणत्या अडचणी आल्या आहेत? तसेच सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीचा रचनेशी निगडीत काही समस्या आहेत का? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी संशोधकाच्या मनामध्ये जिज्ञासा निर्माण झाल्यामुळे प्रस्तुत संशोधन समस्येवर संशोधन होणे गरजेचे आहे.

सदरील संशोधन समस्येवर संशोधन झाल्यानंतर अहमदनगर जिल्ह्यातील कनिष्ठ प्राथमिक स्तरावर सातत्यपुर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीची अमंलबजावणी करीत असताना विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक व पालकांना आणि शासनास कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागेल याची माहिती मिळेल. त्यामुळे भविष्यात सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीची अमंलबजावणी करीत असतांना ज्या ज्या समस्या व अडचणी आल्या तर त्यावर उपाययोजना काय करावी ह्याचे ज्ञान आपल्याला होईल.

सदरील संशोधन समस्येवर संशोधन झाल्यामुळे शैक्षणिक क्रियेचा जो केंद्रबिंदु आहे तो म्हणजे विद्यार्थी त्यामुळे ह्या मुल्यमापन पध्दतीची अमंलबजावणी करीत असतांना विद्यार्थ्यांला कोणकोणत्या समस्या येतात हे माहिती झाल्यामुळे त्या समस्यांचे निरसन करून विद्यार्थ्यांना ह्या मुल्यमापन पध्दतीमध्ये समस्या येऊ नये म्हणून कोणकोणते उपाय योजना करता येतील याची माहिती प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून आपल्याला होईल.

थोडक्यात विद्यार्थ्यांसाठी ह्या मूल्यमापन पध्दतीचे महत्त्व म्हणजे शिक्षकाकडून विद्यार्थी परीक्षार्थी न होता तो स्वयं अध्ययनशील होईल.

शिक्षकांना सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनातील अडचणी व चुका लक्षात येतील व ते योग्य बदल करून घेतील. शिक्षकांना आकारीत मूल्यमापनासंबंधी वापरणारी साधने व तंत्राची कार्यपध्दती लक्षात घेऊन योग्य असे आकारीक मूल्यमापन करता येईल. शिक्षकांना आपल्या अध्यापनाची गुणवत्ता वाढविता येईल. ह्या संशोधनामुळे क्षेत्रात त्यांच्या व्याक्तिमत्त्वाच्या मापनासाठी योग्य साधन वापरण्याचे ज्ञान होईल.

मुख्याध्यापकांना देखिल प्रस्तुत संशोधन समस्येवर संशोधन झाल्यानंतर शिक्षकांना ह्या मुल्यमापन पध्दती विषयी योग्य असे मार्गदर्शन करता येईल. तसेच शासनास ह्या पध्दतीची अमंलबजावणी करतांना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे

लागते याचा अहवाल पाठविण्यास मदत होईल. प्रस्तूत संशोधनामूळे सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीची आपल्या शाळेत प्रभाविपणे अमंलबजावणी कशी करावी याची माहिती मिळेल.

इत्यादी बऱ्याच विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापकांच्या शैक्षणिक बाबीशी निगडीत असलेल्या बाबी सदरील संशोधनाच्या माध्यमातून आपल्याला त्याचे ज्ञान होणार आहे. म्हणून ह्या संशोधनाचे महत्त्व अनन्य साधारण असे आहे.

**समस्या विधान :**

अहमदनगर जिल्ह्यातील कनिष्ठ प्राथमिक स्तरावर सातत्यपुर्ण सर्वकष मूल्यमापनात येणाऱ्या समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दतीचा रचनेशी निगडीत असलेल्या समस्यांचे अध्ययन करणे.

२) सातत्यपूर्ण सर्वकष मुल्यमापनात शाळेशी निगडीत असलेल्या समस्यांचे अध्ययन करणे.

३) सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनात शिक्षकांशी निगडीत असलेल्या समस्यांचे अध्ययन करणे.

**प्रस्तूत संशोधनासाठी वापरलेली पध्दती :**

प्रस्तूत संशोधनासाठी संशोधकाने **सर्वेक्षण पध्दतीचा** वापर केला आहे.

**संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनासाठी अहमदनगर जिल्ह्यातील कनिष्ठ प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, विद्यार्थ्यांचे पालक यांच्याकडून माहिती संकलित करण्यासाठी **प्रश्नावली** हे साधन वापरले आहे.

**संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श :**

संशोधन विषयाशी संबंधित घटकाच्या समूहाला जनसंख्या असे म्हणतात. जनसंख्येत सर्व घटकाचा समावेश असतो. न्यादर्श अभ्यासात ज्याच्याविषयी निष्कर्ष काढावयाचे त्या सर्व व्यक्तीच्या किंवा वस्तूच्या समूहाला जनसंख्या असे म्हणतात.

ISSN–2277- 8721
EIIRJ
Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume–X, Issues–IV July – August 2021

प्रस्तुत संशोधनात अहमदनगर जिल्ह्यातील कनिष्ठ प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक पालक ही संशोधनाची जनसंख्या आहे. विशिष्ट जनसंख्येचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी एखाद्या नियमानुसार अथवा पूर्वनियोजित निवडलेल्या कोणत्याही जनसंख्येतील व्यक्ती वस्तू म्हणजे नमुना किंवा न्यादर्श निवड होय.

प्रस्तुत संशोधनात अहमदनगर जिल्ह्यातील कनिष्ठ प्राथमिक स्तरावरील सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनाचा अभ्यास करण्यासाठी त्याबद्दल माहिती घेण्यासाठी खालील प्रमाणे न्यादर्श आहे.

१. **विद्यार्थी न्यादर्श :** अहमदनगर जिल्ह्यातील ५० विद्यार्थ्यांची निवड न्यादर्श म्हणून केली.

२. **शिक्षक न्यादर्श :** अहमदनगर जिल्ह्यातील १० शिक्षकांची निवड न्यादर्श म्हणून केली.

३. **मुख्याध्यापक न्यादर्श :** अहमदनगर जिल्ह्यातील ०५ मुख्याध्यापकाची निवड न्यादर्श म्हणून केली आहे.

**न्यादर्श निवड पध्दती :**

अहमदनगर जिल्ह्यातील ५० विद्यार्थी, १० शिक्षक, ०५ मुख्याध्यापक यांची **सुगम यादृच्छिक पध्दतीने** नमुना निवड करण्यात आली.

**मुख्य निष्कर्ष :**

१) ८७% विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेतील परीक्षा अवघडपण आणि सोप्यापण असतात असे वाटते.

२) ९०% विद्यार्थ्यांच्या मते त्यांच्या शिक्षकांनी त्यांची एकेका विद्यार्थ्यांची स्वतंत्र व सर्व विद्यार्थ्यांची एकत्रित परीक्षा घेतली.

३) ९५% विद्यार्थ्यांना स्वाध्याय अथवा वर्ग कार्य रोज नियमीत दिल्या जाते.

४) ६५% विद्यार्थ्यांच्या मते शिक्षकांनी त्यांची प्रात्याक्षिक परीक्षा सर्व विद्यार्थ्यांची एकत्रित व गटागटात घेतली.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Volume-X, Issues-IV July - August 2021

५) १००% मुख्यध्यापकांच्या मते सातत्यपुर्ण सर्वकष मूल्यमापन हे इयत्ता १ ली ते ८ वी इयत्तासाठी लागु आहे.

६) ७८% मुख्याध्यापकांना सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पध्दती प्रत्यक्ष वापर केल्यानंतर उपयुक्त व परिपूर्ण वाटते.

७) १००% मुख्याध्यापकांना गरज असलेल्या विद्यार्थ्यांनाच वर्गात स्थगिती द्यावी असे वाटते.

८) ६९% शिक्षकांना दैनंदिन नोंदी या तंत्राबाबत विद्यार्थी संख्या जास्त असल्याने नोंदी घेणे जमत नाही ही समस्या जाणवते.

९) १००% शिक्षकांच्या मते तोंडी काम या साधनाचा वापर करतांना पूर्व तयारी करणे अपेक्षित आहे.

१०) १००% शिक्षकांच्या मतानुसार एका इयत्तेसाठी भारांश निश्चिती नुसार प्रकल्प राबविणे आवश्यक आहे.

११) ९१% शिक्षकांना भावनिक विकासाचे मापन करण्याकरीता कोणकोणती तंत्रे वापरतात हे माहिती नाही.

**संशोधन शिफारशी :**

१) शिक्षकांनी सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनासाठी आकारीक तंत्रातील सर्व तंत्राचा वापर करावा.

२) शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भावात्मक क्षेत्रासाठी विशेष प्रयत्न करावेत.

३) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वतः प्रात्याक्षिक प्रयोग करून पाहण्याची संधी द्यावी.

४) शिक्षकांनी ज्या तंत्रात संभ्रम निर्माण होतो अशा तंत्राची लिखित स्वरूपात नोंद ठेवून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांना कळवावे.

५) शिक्षकांनी घटक चाचणी तयार करतांना संविधान तक्ता तयार करावा.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१) जरग, ना. (२०१२). सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका, भाग ३, पुणे: महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

२) साळूंके, श्री. (२०१०). सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका, पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे.

३) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन (२०१२). बलाकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम - २००९. मुंबई : शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय महाराष्ट्र शासन.

४) दांडेकर, वा.ना. (१९८९). शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र, पुणे : श्री विद्या प्रकाशन.

५) कदम, चा. प. चौधरी, बा. आ. (१९९२). शैक्षणिक मूल्यमापन, पुणे : नूतन प्रकाशन.

६) जोशी, शो. व्ही. (२००४). वर्गाध्यापनाच्या उद्दिष्टांचे मूल्यमापन, औरंगाबाद : मृण्मयी प्रकाशन.

७) पाटील, दि., काळे, रा. (२०१३). सर्वांगिण विकास सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन (शिक्षक मार्गदर्शिका) पुणे : ३० महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

८) शेटकर, ग., जोशी, शो. (२००७). शैक्षणिक मूल्यमापन व कृती संशोधन औरंगाबाद: मृण्मयी प्रकाशन.

९) बापट, भा.गो. (१९८८). शैक्षणिक संशोधन. पुणे : नूतन प्रकाशन.

१०) भितांडे, वि.रा. (१९९४). शैक्षणिक संशोधन पध्दती. पुणे : नुतन प्रकाशन.


**संकेतस्थळे :**


११) www.shodhganga.inflibnet.ac.in